# आवर्तनाच्या पूर्णतेकडे

१ डिसेंबर, २०१८

आत्मीय वाचकांनो,

अनंततेच्या अमर्याद विस्तारात कुठेतरी या वर्षाचा आरंभ झाला आणि त्याच अनंततेच्या अमर्याद अशा विस्तारामध्ये त्याची अखेर होते आहे. पण मग — वर्ष शेवटास जाणे, या गोष्टीचा प्रत्यक्षात अर्थ आहे तरी काय? असे तर नव्हे ना की, वरकरणी तुम्हाला आपला मार्ग शेवटास पोहोचत असल्याचे भासत असताना, तिथूनच पुन्हा तो इंग्रजीतील 8 या अंकाच्या आकृतीतील वळणानुसार वळण घेऊ लागला आहे? जेथून आरंभ केलात, त्यापासून तुम्ही जरी खूप लांब आलेले असलात, तरीदेखील तुम्ही आवर्तनाच्या पूर्णतेकडेही परतत आहात. वर्ष २०१८चा श्रीगुरुमाईंचा संदेश, 'सत्संगा'च्या अभ्यासाद्वारे तुम्ही खूप काही शिकला आहात — तरीदेखील त्या प्रत्येक वेळी जेव्हा तुम्ही स्वतःच्या अंतराच्या संपर्कात येता तसेच त्या प्रत्येक वेळी जेव्हा तुम्ही विराम घेता आणि जोडले जाता, तेव्हा तुम्ही त्याच गोष्टीकडे परतत असता, जी तुम्हाला दीर्घकाळापासून ज्ञात आहे.

आपण आता डिसेंबर महिन्यात पदार्पण करतो आहोत, वर्ष २०१८च्या शेवटच्या महिन्यात. संपूर्ण जगभरात लोक ख्रिसमस, हनुक्काह आणि शीत ऋतूत येणारे इतर सणवार साजरे करण्यासाठीची तयारी करत आहेत. हा कालखंड कुठल्याशा जादूने भारलेला आहे, त्यात एक गूढरम्यता व्याप्त आहे, जी या गोष्टींमुळे अगदीच अप्रभावित राहते की, आपण एखादा उत्सव साजरा करत आहोत किंवा साजरा करत नाही, त्यावर आपला विश्वास आहे किंवा नाही. ही जादू केवळ आपल्यावरच झाली आहे की, गोलाकार फिरणाऱ्या पृथ्वीवरदेखील हीच जादू आहे, जिच्यामुळे विश्वातील अतीशीत प्रदेश बर्फाच्छादित झाले आहेत? हे केवळ आपणच आहोत, की लोकांच्या परस्परांतील वागणूकीत जरा अधिक प्रेम, अधिक सौहार्दता आली आहे, त्यांच्या कृतींमधून एक अशा प्रकारची सौम्यता व सुंदरता व्यक्त होऊ लागली आहे, जी तेव्हाच व्यक्त होते, जेव्हा एखादी व्यक्ती दुसऱ्याला पाहू लागते, *खऱ्या अर्थाने* पाहू लागते? आपण त्याची केवळ कल्पनाच करत आहोत का, की ती आपली तीव्र उत्कंठाही आहे — त्या गोष्टीप्रतिची, जी शब्दात मांडता येत नाही, कदाचित प्रेमाप्रतिची — जे आपल्याला या घडीला अधिक तीव्रतेने जाणवते आहे? हे जणू त्या पश्चिमेकडील वाऱ्याप्रमाणे आहे, जो आपल्या

अस्तित्वातून प्रवास करतो आहे आणि जिथे कुठे त्याला अवकाश सापडेल, तिथे तो सुरमयी तान छेडतो आहे.

ख्रिसमसच्या सुमारास एस.वाय.डी.ए. फाउंडेशनच्या शिक्षकांनी व वक्त्यांनी भगवंताविषयी बोलावे असे आवाहन गेली अनेक वर्षे गुरुमाई करत आहेत. किती सर्वांगसुंदर आवाहन आहे हे आणि असेही एक आवाहन, जे नेमकेपणाने हे स्पष्ट करते की या ख्रिसमसच्या पर्वाला जे महत्त्व प्राप्त झाले आहे, ते का आहे. कारण दिव्यता जी प्रेमाच्या, प्रकाशाच्या, शांतीच्या रूपातून प्रकट होते, ती त्याचेच तर सामूहिक स्मरण आहे, जे डिसेंबरमधील वातावरणाला विशेष अशी चमक प्रदान करत असते. ते काय आहे, जे सहृदयतेच्या कृतींमध्ये आपण अनुभवतो, ती सद्‌गुणाचीच तर अभिव्यक्ती आहे, सद्‌गुण जे आपल्या सर्वांच्या अंतरातच विद्यमान आहेत आणि ते या गोष्टीची पुष्टी असंख्य वेळा करून देतात की मूलतः ते काय आहे, जे आपल्या सर्वांना जोडून ठेवते आणि जे आपल्याला मनुष्यत्व बहाल करते? तीव्र उत्कंठेच्या कंपित तरीही स्पष्ट स्वरांमधून आपण जिला ऐकतो ती काय आहे — ती जोडले जाण्यासाठी आपण घातलेली सादच तर आहे — त्याच्याशी जोडले जाण्याची, जो आपल्याला सहजप्राप्य आहे.

आणि म्हणून, या वर्षाचा प्रारंभ आपण ज्याप्रकारे केला होता त्याप्रमाणेच त्याचे समापनही आपण करणार आहोत : भगवंताचे स्मरण करून आणि दिव्यतेचे आवाहन करून. वर्ष २०१८च्या पहिल्या दिवसापासून, म्हणजे आपल्याला श्रीगुरुमाईंचा संदेश जेव्हा प्राप्त झाला, तेव्हापासून आपण आपल्या हृदयात विद्यमान असलेल्या परम सत्याशी जोडले जाण्याचे, त्याला अनेक रूपांमध्ये जाणण्याचे, आणि बहुविध नामांच्या स्वरांमध्ये त्याचे श्रवण करण्याचे अथक प्रयत्न करत आहोत. प्रत्येक पावलावर आपल्या प्रयत्नांना गुरुमाईंच्या शिकवणींचे व कृपेचे मार्गदर्शन प्राप्त झाले आहे.

आपण या गोष्टीचे स्मरण ठेवत — आतापर्यंत केलेल्या साधनेचा संदर्भ लक्षात ठेवत डिसेंबर महिन्यात प्रवेश करू शकतो. आपण असे समजू शकतो की, होय, भगवंताची स्मरणपत्रे या समयी आपल्यासाठी, विशेषत्वाने उपलब्ध होऊ शकतात — *आणि* तो आपला सजगतेने केलेला प्रयत्नच असतो, जो भगवंताच्या प्रकाशाला आपल्या बोधात अधिक तेजाने सतत दीप्तिमान ठेवत असतो. आपण सत्संगाच्या क्षणांची निर्मिती करत राहू शकतो — इथे, तिथे, सर्वत्र. आपण निरंतरपणे, अगदी या क्षणीदेखील सत्याविषयी जाणण्याचा प्रयत्न चालू ठेवू शकतो, की त्याची जाणीव कशी असते, त्याचा ध्वनी आहे तरी कसा, त्याच्या रसाचा, ‘सत्यरसाचा’ स्वाद कसा आहे.

सरतेशेवटी, हा सातत्याने चालत राहणारा एक प्रवास आहे. त्यामुळेच आवर्तनांमध्ये फिरत राहूनही प्रगती करता येऊ शकते, कारण आवर्तने जरी असली, तरी अनंतता ही अनंतच राहते. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, "हेचि आत्मप्रभा नित्य नवी" अर्थात 'आत्म्याचा प्रकाश नित्य नवीन असतो.'[१] आपले प्रयत्न आपल्याला पुन्हापुन्हा त्याच स्थानी आणतात, केवळ यासाठीच की, अधिक खोलवर जाण्यासाठी आपल्याला अधिक आश्चर्यकारक गोष्टींचा शोध घेता यावा, अधिक आनंदाचा शोध घेता यावा, अधिक प्रेरणेचा शोध आपणास घेता यावा. हे वर्ष भलेही लवकरच त्याच्या शेवटास येते आहे; परंतु सत्संगाचा आपला अभ्यास, आपल्याच सत्संगतीशी आपला परिचय करून देत राहण्याचा आपला अभ्यास, आपल्या अस्तित्वाच्या परम सत्याविषयी जागृत होत राहण्याचा आपला अभ्यास — या सर्वांची सांगता वस्तुतः कधीच होणार नाही.

या महिन्यात, जेव्हा शीत ऋतूतील उत्सव आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या कामांमुळे असणारी व्यस्तता येते आहे, तेव्हा सिद्धयोग मार्गाची वेबसाइट तुम्हाला सत्संगाचे क्षण निर्माण करण्यास मदत करेल. तुम्ही वेबसाइटवर 'श्रीगुरुमाईंच्या वतीने वर्ष २०१८च्या ख्रिसमससाठी शुभेच्छा' [सीझन्स् ग्रीटिंग] प्राप्त करून सुरुवात करू शकता — आणि मग संपूर्ण महिनाभर या उत्कृष्ट ग्रीटिंगला पुन्हापुन्हा भेट देत राहा, जे करण्याची तुमची इच्छा निःसंदेह असणारच. श्रीगुरुमाईंकडून प्राप्त यांच्यात अर्थपूर्णता निहित आहे. हा उपहार आपल्याला गुरुमाईंचे प्रेम प्रदान करतो; तो उपहार त्यांच्या शिकवणी प्रकट करतो.

या महिन्याच्या उत्तरार्धात वेबसाइटवर काही कथा, 'राम राघव' या नामसंकीर्तनाचे रेकॉर्डिंग आणि एका 'शांती' मंत्राविषयीचे भाष्य व त्याचा ऑडिओ यांचे प्रसारण करण्यात येईल. त्याबरोबरच वेबसाइटवर उल्लासपूर्ण पोस्टस्, जसे की, वार्षिक 'हॅपी हॉलिडेज्' गॅलरी आणि 'व्हर्चूअल हॉलिडे ट्री' [virtual holiday tree] देखील असतील, ज्यामध्ये तुम्ही देवाणघेवाणीच्या स्वरूपात सहभागी होऊ शकाल आणि या वृक्षाला तुम्ही त्या अलंकारांनी सुशोभित करू शकाल, जे गुरुमाईंच्या २०१८साठी असलेल्या संदेशाच्या पूर्वस्मृतींना उजाळा देतात.

या सर्व मार्गांनी आणि अजूनही अधिक काही पद्धतींनी एकत्र येत, आपण एक संघम् म्हणून या शीत ऋतूतील उत्सव साजरे करणार आहोत. आपण एकत्र येऊन या वर्षाचा समारोप करू आणि आपण एकत्र येतच नववर्षाचा प्रारंभही करू.

होय, मंगळवारी, दिनांक १ जानेवारी २०१९ रोजी आपण सर्व जण सिद्धयोग वैश्विक हॉलमध्ये 'मधुर सरप्राइझ'साठी एकत्र येणार आहोत. ज्याप्रमाणे शतकानुशतके आध्यात्मिक जिज्ञासू आपल्या गुरूंकडून

प्रज्ञान प्राप्त करण्यासाठी एकत्र येत राहिले आहेत, त्याप्रमाणेच आपण सर्व जण एकत्र जमणार आहोत — असे ज्ञान की जे उन्नत करते आणि रूपांतरित करते, जे अज्ञानाचा पडदा दूर करते आणि आपल्याला परम वास्तवतेकडे निर्देशित करते, त्या वास्तवतेकडे जी त्याहूनही अधिक यथार्थ आणि आनंददायी आहे जी आपल्या अंगवळणी पडली आहे. श्रीगुरुमाई आपल्याला त्यांचा वर्ष २०१९साठीचा संदेश प्रदान करतील आणि आपण, आपण सर्व जण किती भाग्यवान आहोत.

'मधुर सरप्राइझ्', २०१९ तसेच त्यासाठी करावयाची पूर्वतयारी यांविषयीची माहिती सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर लवकरच उपलब्ध होईल.

* * *

मी या पत्रलेखनाची आणि वर्षभर आपल्यात सुरू असलेल्या या अतिशय छान अशा पत्रव्यवहाराची सांगता एका कथेच्या सादरीकरणासह करू इच्छिते.

ती मागील वर्षाची नववर्षारंभापूर्वीची सायंकाळ होती, ३१ डिसेंबर, २०१७. तो एक संगम होता, एका नूतनारंभाचा आणि शेवटाचा; एक संधीकाल होता, एक उंबरा होता, अनंततेच्या दोन वळणदार आवर्तनांमधील आमचे ते एक वळण होते; जे आपण पूर्ण केले होते.

मी आणि इतर काही सेवाकर्ते गुरुमाईंबरोबर भगवान नित्यानंदांच्या मंदिरात सायंकाळच्या पूजेसाठी जात होतो. अनुग्रह बिल्डिंगच्या वरच्या लॉबीतून त्या चालत जात असताना योगायोगाने त्यांच्याशी आमची भेट झाली होती. त्यांनी आम्हाला जेव्हा विचारले की आम्ही सर्व जण कुठे जात आहोत, तेव्हा आमच्यातील प्रत्येकाने एकापाठोपाठ आणि अतिशय उत्साहाने सांगितले : "जिथे कुठे तुम्ही जात आहात तिथेच, गुरुमाई!"

आम्ही मंदिराकडे जाणाऱ्या पॅसेजमधून जात असताना आकाश अंधारून आले होते, सूर्यदेवतेने काही वेळापूर्वीच स्वतःला रात्रीच्या मखमली आवरणाखाली झाकून घेतले होते. लुकलुकणाऱ्या दिव्यांच्या माळा नजिकच्याच कठड्यांवर गुंडाळलेल्या होत्या. दूर अंतरावरील एका स्थानावरून, कदाचित लॉबीपासून लांब असलेल्या एका खोलीतून हास्याचे स्वर आमच्या कानी येत होते.

आम्ही गुरुमाईंच्या मागोमाग मंदिरात गेलो. पूजेत अर्पण करण्याच्या वस्तू एक-एक करत आम्ही पुढे आणल्या — अत्तरे, कुंकू, उगाळलेले चंदन, हळद, अक्षत, ढीगभर गुलाबाच्या पाकळ्या. मंदिराच्या आतल्या भागात मौनाची नीरवता पसरली होती, तरीदेखील त्याला एक स्पंदनशीलता होती आणि

त्यात एक मखमली मृदुलता व्याप्त होती. आम्ही अतिशय मंत्रमुग्धपणे पाहत होतो, गुरुमाईंनी बडे बाबांच्या पादुकांना निरनिराळ्या अत्तरांनी आणि लेपांनी अभिषेक केला आणि मग त्यांनी त्यांच्या हातांमध्ये भरपूर पाकळ्या गोळा केल्या. त्या गुलाबपाकळ्या त्यांनी पादुकांना अर्पण केल्या, त्या वेळी ते असे भासत होते की जणू काही ती फुले रंगाची एक अखंडित रिबिन तयार करत आहेत.

त्या दिवसाच्या आरंभी श्री निलयमध्ये झालेल्या एका सत्संगात गुरुमाईंनी काही तरुणांना नामसंकीर्तनाच्या वेळी नृत्य करण्यास सुचविले. काही वेळानंतर गुरुमाईंनी एका संगीत-सेवाकर्त्याला असे विचारले की, ते तरुण नृत्य करत आहेत हे पाहून त्याला त्यांचा हेवा वाटला नाही का [कारण तो त्या वेळी बासरी वाजवत होता], तेव्हा त्याने सांगितले की, होय, खरेतर *त्यालादेखील* नृत्य करायचे होते — त्याला नृत्य करणे खूप आवडते.

तो संगीत-सेवाकर्ता, त्या सायंकाळी मंदिरात उपस्थित असलेल्या लोकांमध्ये होता. आणि त्याची ती इच्छा, जी त्याने त्याच्या श्रीगुरूंसमोर अतिशय प्रामाणिकपणे काही तासांपूर्वीच व्यक्त केली होती, ती आता सफल होणार होती. मग गुरुमाईंनी आम्हाला नृत्यासाठी आमंत्रित केले.

भूपाली रागातील 'ॐ नमो भगवते मुक्तानंदाय' हे संकीर्तन मंदिरातून प्रवाहित होऊ लागले आणि बडे बाबांच्या मूर्तीभोवती आम्ही गोलाकार फिरू लागताच नामसंकीर्तनाच्या स्वरमाधुर्याने आमच्या सभोवताली फेर धरला. पूजेत वापरल्या गेलेल्या खस अत्तराचा सुगंध वातावरणात मिसळला जाऊन सर्वत्र दरवळत होता; त्याच्या तीव्र, मुग्ध करणाऱ्या सुगंधाने आम्हाला एका निराळ्याच लोकात नेले, त्याचा अर्थ मी असा लावला की, अशा लोकात, जिथे भावाची अभिव्यक्ती मुख्यतः सुगंधाद्वारेच होत असावी.

आणि — आम्ही नृत्य केले. आम्ही गुरुमाईंसोबत नृत्य केले, बडे बाबांच्या समक्ष, बडे बाबांच्या नामाचे गान करत. काही लोक लांबलचक आणि हळुवार गतीने चालणाऱ्या वर्तुळात नृत्य करत होते, अगदी एखादा फकीर करत असलेल्या ध्यानाप्रमाणे. काही लोकांनी बळकट, दृढ, सार्थ पावले उचलली होती, त्यांच्या पायांखालील जमीन त्यांच्या गतीला ऊर्जा आणि दृढता प्रदान करत होती. आमच्यातील काही जणांचे हात हवेत मस्तीने डोलत होते — भगवंताच्या उल्लासपूर्णतेत आणि त्याच्याशी संवाद साधत. त्या भगवंताशी जो सर्वव्यापी आहे आणि त्या वेळी साक्षात तिथेही उपस्थित होता.

गुरुमाई आमच्याबरोबर नृत्य करत असताना मी गुरुमाईंकडे पाहत होते, त्यांच्या मृदू स्मितहास्याकडे पाहत होते. आणि त्याच क्षणी, माझ्या अंतरातील काहीतरी खुले झाले. किंवा — कोणास ठाऊक? कदाचित ते सर्व यासाठी घडत होते की जेणेकरून अंतरातील अधिक यथार्थ आणि अधिक व्यापक

अशा स्थानी प्रवेश करता यावा. आमच्यातील प्रत्येक जण स्वतःच्या पद्धतीने जरी फिरत होता, तरीदेखील आमच्या हालचालींमध्ये सामंजस्य होते, कुठल्या तरी अलौकिक शक्तीबरोबर एकतान होऊन, जिने नामसंकीर्तनाच्या रसपूर्ण सूरावटींवर फेर धरला होता. आमच्यातील प्रत्येक जण स्वतःच्या पद्धतीने भगवंताशी संवाद साधत होता, तरीदेखील हे सर्व आम्ही एकत्रितपणे करत होतो, सिद्धांच्या संगतीत करत होतो. आणि त्यांच्यामुळे, केवळ आमच्या परमप्रिय गुरुमाईंमुळे आम्ही हा अनुभव घेऊ शकलो होतो. त्यांनी आम्हाला कृपा आणि प्रज्ञान प्रदान केले होते.

निरंतरतेने आम्ही नृत्य करतच राहिलो, किती काळ ते मी सांगू शकणार नाही. आणि मग, रात्री निश्चितच आम्ही कोणत्या ना कोणत्या समयी आपापल्या निवासस्थानी परतलो असू. पण मला असे वाटते — खरच आम्ही निघून गेलो होतो का? की हा आमचा नृत्य सप्ताह या विस्तृत ब्रह्मांडातील एखाद्या दूरवरच्या नक्षत्रावर, मानव-हृदयाच्या एखाद्या चमचमत्या भव्य गुहेत कुठेतरी चालू असेल? तो ठीक इथेही चालू आहे का? आता, या क्षणी? तुमच्या सर्वांबरोबर?

आपण निरंतरतेने नृत्य करतच आलो आहोत, तुम्ही आणि मी आणि प्रत्येक जण एक सत्य जाणण्याच्या शोधात आहोत, ते सत्य जे सदैव आपलेच आहे, जेणेकरून आपण त्याला जाणून घ्यावे. आपण निरंतरतेने नृत्य करतच राहू, सत्संगातून, महापुरुषांच्या संगतीत, अनंततेत.

आदरपूर्वक,

ईशा सरदेसाई

---

[१] ज्ञानेश्वरी - ६:२३, इंग्रजी भाषांतर एस.वाय.डी.ए. फाउंडेशनद्वारे.

© २०१८ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.